**जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०
डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर (ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी संनित्रण समिती स्थापन करण्याबाबत)**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन परिपत्रक क्र. डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४ (भाग-२)/विशा १ ब**

शहीद भगतसिंग चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१७.

<u>वाचा :-</u>

१. शासन परिपत्रक, गृह विभाग क्र.डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४/विशा १ ब, दिनांक ०६.०७.२०१५, १४.०७.२०१५, २८.०७.२०१५.

२. मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१७३/२०१० संदर्भात दिनांक १३.०३.२०१५, २४.०६.२०१५ तसेच १०,११,१२ व १६:८.२०१६ रोजी दिलेले आदेश.

<u>प्रस्तावाना :-</u>

राज्यात साजरे करण्यात येत असलेले विविध सण, उत्सव व कार्यक्रमामुळे होत असलेल्या ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या अनिष्ट परिणामांना आळा घालण्यासाठी ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ लागू करण्यात आलेले आहेत. सदर नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.१७३/२०१० डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर दाखल करण्यात आलेली आहे. याचिकेवरील सुनावणी दरम्यान मा.न्यायालयाने दिनांक १०,११,१२ व १६.०८.२०१६ रोजी सविस्तर आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना मार्गदर्शक सूचना व आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तथापि, सदर याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीमध्ये सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी यंत्रणेकडून सुयोग्यरित्या होत नसल्याचे शासनाच्या व मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्या अनुषंगाने, मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांप्रमाणे ध्वनीप्रदूषण नियंत्रणाबाबतची कार्यवाही अधिक प्रभावीपणे होण्यासाठी संनियंत्रण समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती :-

<u>परिपत्रक :-</u>

जनहित याचिका क्र.१७३/२०१० या संदर्भात मा उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.२०१५, २४.०६.२०१५ व दिनांक १०,११,१२ व १६.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ध्वनी प्रदूषणासंदर्भात प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने वर नमूद परिपत्रकाद्वारे कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत. ध्वनी प्रदूषणाकरिता पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यास प्रभारी अधिकारी म्हणून प्राधिकृत करणे, सार्वजनिक उत्सव वा सणांच्या दरम्यान

आयोजकांना वा मंडळांस परवानगी देणे, ध्वनीप्रदूषणाबाबत कोणाकडे तक्रार करावयाची याबाबतची माहिती उदा. अधिकाऱ्यांचे नांव, नियंत्रण कक्ष दूरध्वनी, टोल फ्री क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी इ.बाबतची कार्यवाही तसेच सदर केलेल्या कार्यवाहीस पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही अधिक प्रभावीपणे होण्यासाठी तसेच ध्वनी प्रदूषणासंदर्भात पाळावयाच्या नियमांबाबत संपूर्ण राज्यात एकसूत्रीपणा येण्यासाठी सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांनी खालीलप्रमाणे ध्वनी प्रदूषण संनियंत्रण समिती तात्काळ गठीत करण्याचे आदेश देण्यात येत आहेत :-

**संनियत्रण समितीची** (Monitoring Committee) **संरचना**

अ) मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व नागपूर आयुक्तालयाकरिता :-

| | |
|---|---|
| १.सह पोलीस आयुक्त-<br>(मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता सह पो.आयुक्त (का.व.सु.) | अध्यक्ष |
| २.पोलीस उपायुक्त<br>(प्रत्येक परिमंडळनिहाय) | सदस्य |
| ३.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | सदस्य |

ब) अमरावती, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, लोहमार्ग मुंबई आयुक्तालयाकरिता :-

| | |
|---|---|
| १.पोलीस आयुक्त | अध्यक्ष |
| २.पोलीस उपायुक्त<br>(प्रत्येक परिमंडळनिहाय) | सदस्य |
| ३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | सदस्य |

क) सर्व जिल्हयांकरिता :-

| | |
|---|---|
| १.अपर पोलीस अधिक्षक | अध्यक्ष |
| २.पोलीस उप अधिक्षक (गृह) | सदस्य |
| ३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | सदस्य |

उपरोक्त प्रमाणे गठित करण्यात आलेल्या संनियंत्रण समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :-

१. ध्वनी प्रदूषण उल्लंघनाबाबत सामान्य नागरिकांच्या १०० नंबर वर, व्हॉटस् ॲपवर, दूरध्वनीवरुन अथवा ई मेलद्वारे आलेल्या सर्व तक्रारी पोलीस ठाण्यामध्ये संबंधित नोंदवहीमध्ये नोंदविल्या जातात किंवा कसे याची शाहनिशा करावी.

२. प्राप्त तक्रारीची दखल घेऊन उपलब्ध ध्वनीमापक यंत्राद्वारे (Noise Level Meter) पोलीस ठाण्यांकडून तपासणी करण्यात येते अथवा नाही याबाबत खात्री करण्यात यावी.

३. प्राप्त तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास, तसेच ध्वनी प्रदूषण व इतर बाबींचा भंग झाल्याचे आढळून आल्यास, ध्वनीप्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ व १९ अन्वये सर्व संबंधितांवर प्राधिकृत करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी यांचेमार्फत कारवाई करुन घेण्यात यावी.

४. प्राप्त तक्रारींमध्ये तथ्य आढळून आल्यास तसेच ध्वनीप्रदूषण व इतर बाबींचे भंग झाल्याचे आढळून आल्यानंतर देखील ध्वनीप्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये गुन्हा नोंदविण्याबाबतची कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आल्यास, संनियंत्रण समितीने संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधिक्षक यांचेकडे सादर करावा.

५. लिखित परवानगीशिवाय कोणीही इसम अथवा/संस्थांकडून लाऊडस्पीकर किंवा पी ए सिस्टीमचा वापर करण्यात येतो अथवा नाही याबाबतची खात्री पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी करावी म्हणून त्यांना सूचना दयाव्यात.

६. तक्रार प्राप्त झाल्यानंतर घटनास्थळी वापरात असलेले ध्वनीक्षेपक/ डीजे/ वाद्यवृंद/ साऊंड सिस्टिम इ.साधनांचा वापर करण्यास संबंधित आयोजक वा व्यक्तीने आवश्यक ती परवानगी घेतली आहे अथवा नाही याबाबत पडताळणी करावी. ध्वनीक्षेपकासंबंधात विहित परवानगी घेतली असली तरीही तसेच जनतेकडून तक्रार आली नसतानासुध्दा संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी त्या ठिकाणी जाऊन ध्वनीमापन यंत्राद्वारे तपासणी करुन ध्वनीप्रदूषण झाले किंवा नाही याची तपासणी करावी. अशा ठिकाणी ध्वनीप्रदूषण व इतर बाबींचा भंग झाल्याचे आढळून आल्यास ध्वनीप्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये सर्व संबंधितांवर गुन्हे नोंदविण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना सर्व प्रभारी पोलीस अधिकारी यांना देण्यात याव्यात.

७. ध्वनीप्रदूषण नियमाचे उल्लंघन झाल्याची पोलीस ठाण्यास तक्रार प्राप्त होताच संबंधित पोलीस अंमलदार/बीट अंमलदार तात्काळ घटनास्थळी भेट देऊन ध्वनीकंपन क्षमता मोजणारे यंत्रामार्फत आवाजाची तीव्रता तपासून पुढील कायदेशीर कारवाई करतात अथवा नाही याबाबी वेळोवेळी तपासण्यात याव्यात.

८. दिवसा/रात्री केव्हाही लाऊडस्पिकर किंवा पी ए सिस्टिम विनापरवाना सुरु असल्याचे आढळून आल्यास ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात यावी. दिलेले परवाने संबंधित पोलीस ठाण्यांकडून रद्द करण्यात यावेत.

९. ध्वनीप्रदूषण नियमाची अंमलबजावणी करण्याकरीता प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची नांवे, पदनाम, कार्यालयीन संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्र.ई मेल आयडी, इ.बाबतची माहिती स्थानिक वर्तमानपत्रे, स्थानिक केबल नेटवर्क ऑपरेटर्स व इतर प्रसार माध्यमातून त्याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी.

१०. सदरहू प्रकरणी मा उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची तसेच याबाबत शासनाने व पोलीस महासंचालक कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांची / सूचनांची योग्यप्रकारे अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची सर्वस्वी जबाबदारी ही संनियंत्रण समितीची राहील.

११.पोलीस आयुक्तालयात/जिल्हयात स्थापन करण्यात येणाऱ्या संनियंत्रण समितीवरील अधिकारी/सदस्यांची नावे व पदनामे व दूरध्वनी क्रमांक इ.बाबतची माहिती शासनास कळविण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक पर्यावरण विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७०२२८१५४२३२६०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2017.02.28 15:45:24 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा.मंत्री /मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. महाराष्ट्रातील सर्व मा.संसद सदस्य
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
७. सर्व मा. विधानपरिषद / विधानसभा सदस्य
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग
१०.अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१४.पोलीस आयुक्त (सर्व)
१५.परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व)
१६.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी (सर्व)
१७.जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
१८. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९.गृह विभाग/ विशा १ ब
२०.निवड नस्ती.

IN - 99

अतितात्काळ/न्यायालयीन प्रकरण

क्र :- पोमसं/२४/३४/जनहित याचिका/१७३/१०/२४०/१५ मुंबई, दिनांक ०७.०३.२०१७.

**संदर्भ :-** शासन, गृह विभाग यांचे क्रमांक डिआयएस ०९१०/प्र क्र ४३४/ [भाग २]/विशा १ ब, दिनांक २८.०२.२०१७ चे परिपत्रक

**विषय :- जनहित याचिका क्र १७३/२०१०**
डॉ महेश बेडेकर वि महाराष्ट्र शासन व इतर

ooooo

उपरीक्त विषयाबाबत संदर्भात नमूद असलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने खाली नमूद पोलीस घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणी व्यक्तिश: लक्ष घालून पुढील योग्य ती कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करुन त्याची प्रत या कार्यालयास ई मेल क्र dgpmumbaidesk२४@gmail.com वर न चुकता पाठवावा.

7/3/17

[ महेंद्र पेडणेकर ]
वरिष्ठ कार्यासन अधिकारी
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त [ लोहमार्गासह ]
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक [ लोहमार्गासह ]

DSB

| |
|---|
| पो.अ. |
| अति.पो.अ. |
| पो.उप.अ. (मु.) |
| 07 MAR 2017 |
| का.अ. |
| प्र.लि. |
| आ.क्रमांक |

O.S. 2७15
09/03/17

GR

RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ५७] बुधवार, मे १७, २०१७/वैशाख २७, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १२४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**पर्यावरण विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ मे २०१७

**शुद्धिपत्र**

क्रमांक ध्वनीप्र. २०१६/प्र.क्र.१४०/तां.क. १.—ज्याअर्थी, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासनाने राज्यातील वाहनांमध्ये वापरण्यात येणाऱ्या हॉर्न्स, सायरन्स आणि/किंवा मल्टीटोन हॉर्न्स यासाठीची मानके व त्यांचा वापर या विषयानुसार अधिसूचना क्र. MIS/२०१४/प्र.क्र-७१/तां.क-१, दिनांक ३१ जुलै २०१४ पारित केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक २९ डिसेंबर २०१६ रोजीच्या पत्रानुसार ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील नियम ५ मधील उप-नियम ४ मध्ये " सार्वजनिक स्थळांवर ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणांचा आवाज हा त्या क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या मानकांपेक्षा १० dB (A) च्या मर्यादेत वा ७५dB (A) यापैकी कमी असलेले असावा." यामध्ये रुग्णवाहिका वा अन्य आपत्कालिन वाहनांच्या हॉर्न/भोंग्याचा समावेश नाही. रुग्णवाहीकांमधील हॉर्न/भोंग्याच्या आवाजाची मर्यादाही नॅशनल ॲम्बुलन्स कोड (एआयएस १२५) मध्ये नमूद केल्यानुसार ११० dB (A) ते १२० dB (A) च्या मर्यादेत असावेत;

आता त्यामुळे, दिनांक ३१ जुलै २०१४ रोजीच्या अधिसूचनेतील परिच्छेद (३) खालील प्रमाणे वाचावा :—

(३) प्रत्येक वाहनांकरिता, त्या वाहनांच्या प्रकारानुसार, पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ मधील परिशिष्ट ४ मधील भाग ई मध्ये ठरवून दिलेल्या इंजिनाच्या ध्वनीच्या पातळीपेक्षा १० dB (A) पेक्षा जास्त ध्वनी मर्यादा उल्लंघन न करणारे हॉर्न्स बसविणे बंधनकारक आहे. तथापि ॲम्बुलन्स व आपत्कालीन सेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवरील सायरनची मर्यादा नॅशनल ॲम्बुलन्स कोड AIS : १२५ प्रमाणे ११० dB (A) ते १२० dB (A) असावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अपूर्व चंद्रा,**

शासनाचे प्रधान सचिव.

जिल्हाधिकारी कार्यालय
नांदेड. 60
28 JUN 2017
शाखा : RB-I
अनु.क्र.

जनहित याचिका क्र.८५/२००७ मध्ये दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिका (लॉजिंग) क्र.३/२०१७ आवाज फाउंडेशन आणि इतर विरुध्द श्री.शिलवंत ढवळे, सहायक पोलिस आयुक्त, माहिम विभाग, मुंबई.
ध्वनी प्रदूषण नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत.

49257
28/06/2017

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्र. सीआरटी-०३१४/प्र.क्र.६४/विशा-५.
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ मे, २०१७.

वाचा :-

१) शासन परिपत्रक क्र.डिआयएस ०९०/प्र.क्र.४३४ (भाग-२)/विशा-१ब, दिनांक २८/०२/२०१७.
२) शासन पुरकपत्र क्र.डिआयएस ०९०/प्र.क्र.४३४ (भाग-२)/विशा-१ब, दिनांक ०३/०४/२०१७.

प्रस्तावना :-

मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.८५/२००७ मध्ये दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिका (लॉजिंग) क्र.३/२०१७ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात दिनांक ०३/०५/२०१७ रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीच्या वेळी पोलीस आयुक्तालयाने राज्यातील विविध सण उत्सव इ. तसेच विविध कार्यक्रम साजरे होत असताना, शांतता क्षेत्रात आवाजाची पातळी ओलांडून कायद्याचे उल्लंघन होऊ नये याकरिता सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या शांतता क्षेत्रामध्ये ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना सूचित करण्यात यावे, असे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेश दिले आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार शांतता क्षेत्रामध्ये होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत अधिक काटेकोरपणे नियमांचे पालन होणे व नियमांचा भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याने, यासंदर्भात राज्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती :-

परिपत्रक :-

मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.१७३/२०१० या याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक १०, ११, १२ व १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक २८/०२/२०१७ च्या शासन परिपत्रकाद्वारे ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबतची कार्यवाही अधिक प्रभावीपणे करण्यासाठी ध्वनी प्रदूषण संनियंत्रण समिती गठीत केली आहे. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची तसेच याबाबत शासनाने व पोलीस महासंचालक कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांची / सूचनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची सर्वस्वी जबाबदारी सदर संनियंत्रण समितीला देण्यात आली आहे.

आता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.८५/२००७ संदर्भात दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिकेवर दिनांक ०३ मे, २०१७ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार, शांतता क्षेत्रामध्ये विविध सण, उत्सव व कार्यक्रमा दरम्यान आवाजाची पातळी (लाऊडस्पीकर, डी.जे., मिरवणुका व तत्सम वाद्य यांच्या आवाजामुळे) ओलांडून ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच आवाजाची पातळी (लाऊडस्पीकर, डी.जे., मिरवणुका, लग्न वरात व तत्सम वाद्य यांच्या आवाजामुळे) ओलांडून ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०५२४१३२७३२६८२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2017.05.24 13:46:49 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. महाराष्ट्रातील सर्व मा.संसद सदस्य
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद
६. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा
७. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग
१०.अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१४.पोलीस आयुक्त (सर्व)
१५.परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व)
१६.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी (सर्व)
१७.जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
१८. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९.गृह विभाग / विशा-५
२०.निवड नस्ती.

------

अतितात्काळ/ न्यायालयीन प्रकरण

क्र :- पोमसं/२४/३४/जनहित याचिका/१७३/१०/२४०/१५ मुंबई, दिनांक २९.०६.२०१७.

संदर्भ :- १]शासन गृह विभाग यांचे परिपत्रक क्र. डिआयएस ०९१०/प्र.क्र. ४३४/वि.शा. १-ब, दि.१/०७/२०१५

२] शासन नगर विकास विभाग यांचे परिपत्रक क्र. याचिका२०१५/सं.क्र. ८७८ [१]/नवि ३४, दि.६/०७/२०१५

३]शासन गृह विभाग यांचे परिपत्रक क्र. डिआयएस ०९१०/प्र.क्र. ४३४/वि.शा. १-ब, दि.१४/०७/२०१५

४] शासन पर्यावरण विभाग यांचे परिपत्रक क्र. याचिका-२०१५/प्र.क्र.०६/तां. क्र-१, दि.२८/०७/२०१५.

५] शासन गृह विभाग यांचे परिपत्रक क्र. सीआरटी ०३१४/प्र.क्र. ६४/वि.शा. ५, दि.२४/०५/२०१७.

६] या कार्यालयाचे समक्रमांक दि.१२/०४/२०१२ चे ज्ञापन.

७] या कार्यालयाचे समक्रमांक दि.२४/०६/२०१५ चे ज्ञापन.

८] या कार्यालयाचे समक्रमांक दि.२९/०६/२०१५ चे ज्ञापन.

९] या कार्यालयाचे समक्रमांक दि.६/०७/२०१५ चे ज्ञापन.

१०] या कार्यालयाचे समक्रमांक दि.८/०७/२०१५ चे ज्ञापन.

११] या कार्यालयाचे समक्रमांक दि.२२/०७/२०१५ चे ज्ञापन.

१२] या कार्यालयाचे समक्रमांक दि.१०/०९/२०१५ चे ज्ञापन.

१३] या कार्यालयाचे समक्रमांक दि.१/०४/२०१६ चे ज्ञापन.

१४] या कार्यालयाचे समक्रमांक दि.२७/०६/२०१६ चे ज्ञापन.

१५] या कार्यालयाचे समक्रमांक दि.२७/०६/२०१६ चे ज्ञापन.

१६] या कार्यालयाचे समक्रमांक दि.२०/०९/२०१६ चे ज्ञापन.

१७] या कार्यालयाचे समक्रमांक दि.२०/१०/२०१६ चे ज्ञापन.

१८] या कार्यालयाचे समक्रमांक दि.१०/११/२०१६ चे ज्ञापन.

१९] या कार्यालयाचे समक्रमांक दि.१८/०३/२०१७ चे ज्ञापन.

DSB
पो.अ.
अति.पो.अ.
पो.उप.अ. (मु.)
05 JUL 2017
का.अ.
प्र.लि.
आ.क्रमांक
55/7

विषय :- जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० डॉ. महेश बेडेकर वि महाराष्ट्र शासन व इतर [ध्वनीप्रदूषण नियमांची अंमलबजावणीबाबत]

००००००

राज्यात साजरे करण्यात येत असलेल्या विविध सण, उत्सव व कार्यक्रमामुळे होत असलेल्या ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणा-या अनिष्ट परिणामांना आळा घालण्यासाठी ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ लागू करण्यात आलेले आहेत. सदर नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता डॉ. महेश बेडेकर व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका [क्र. १७३/२०१०] दाखल केली आहे. सदर जनहित याचिका प्रलंबित आहे.

२. याचिकेवरील सुनावणीदरम्यान मा. न्यायालयाने ध्वनी प्रदुषणाबाबतच्या नियंत्रणाबाबत वेळोवळी दिलेल्या निर्देश/ आदेशानुसार, शासनाने संदर्भाधीन दि.१/०७/२०१५, ६/०७/२०१५, १४/०७/२०१५, २८/०७/२०१५ व दि.२४/०५/२०१७ अन्वये परिपत्रक निर्गमित करुन ध्वनीप्रदूषण नियमांची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. ध्वनीप्रदूषण नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याकरीता या कार्यालयाकडून सर्व पोलीस घटक प्रमुखांना संदर्भाधीन दि.१२/०४/२०१२, २४/०६/२०१५, २९/०६/२०१५, ६/०७/२०१५, ८/०७/२०१५, २२/०७/२०१५, १०/०९/२०१५, १/०४/२०१६, २७/०६/२०१६, २७/०६/२०१६, २०/०९/२०१६, २०/१०/२०१६, १०/११/२०१६ व दि.१८/०३/२०१७ चे ज्ञापनान्वये वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत.

३. ध्वनीप्रदूषण नियमांची अंमलबजावणीबाबत महाअधिवक्ता, महाराष्ट्र शासन यांच्या मा. उच्च न्यायालय येथील कार्यालयात बुधवार दि.२१/०६/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस अपर पोलीस महासंचालक [का. व सु.] हे उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान महाअधिवक्ता यांनी प्रतिवादी यांच्या वतीने सुचविलेले मुद्दे अपर पोलीस महासंचालक [का. व सु.] यांना

दिले व त्यावर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत प्रतिवादी यांच्यावतीने उपस्थित केलेले मुद्दे पौलीस विभाग, पर्यावरण विभाग, आर. टी. औ. ई. यांचेशी संबंधीत आहेत. पौलीस विभागाबाबत खालील मुद्दे उपस्थित केले आहेत :-

१] हॉर्न वाजविण्याबाबत टॅक्सी, ऑटो रिक्षा युनियन व खाजगी कंपन्याची वाहने शहरामध्ये honking बद्दल जागृती निर्माण करणे.

२] वाहतुक पौलीस यांनी मौटार व्हेईकल कायद्याखाली कायद्यानुसार honking बद्दल कडक कारवाई करणे व अपराधी यांच्यावर कायद्यानुसार दंडात्मक तसेच वाहनाचे हॉर्न जप्त करण्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी.

३] आर. टी. औ. व पौलीस विभाग यांनी एकत्र मिळून PUC drives च्या पध्दती प्रमाणे हॉर्न वाजविण्याविरोधात विशेष मोहिम राबवून योग्य कारवाई करावी.

४] पौलीस विभाग यांनी रात्रीच्या वेळी मौटार सायकल रेसींग बद्दल विशेष मोहिम राबवावी.

४ प्रतिवादी यांनी उपस्थित केलेले पौलीस विभागाशी संबंधीत उक्त मुद्यांच्या अनुषंगाने पौलीस दलाकरीता पुढीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

१] सर्व वाहतुक पौलीसांना सुचना देण्यात याव्या की, त्यांनी दि.१/०७/२०१७ ते ३१/०७/२०१७ पासून Anti Honking Drive प्रत्येक पौलीस ठाणेच्या हद्दीत सूरु करण्यात यावे व कायद्यानुसार गाडयाचे हॉर्नमुळे ध्वनी प्रदुषण करणा-या व्यक्ती विरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दि.०८/०८/२०१७ पुर्वी या कार्यालयास सादर करावा. सदरची कार्यवाही स्पेशल ड्राइव्ह जुलै महिना संपल्यानंतर सुध्दा पुढे चालू ठेवून त्याबाबतचा अहवाल दर ०३ महिन्यांनी या कार्यालयास सादर करावा.

२] संबंधीत टॅक्सी व रिक्षा युनियन/ खाजगी वाहन यांच्यामुळे होत असलेल्या ध्वनी प्रदुषणाबाबत आर. टी. औ. यांच्याशी सल्ला मसलत करुन त्याबाबत जागृकता निर्माण करण्याबाबत पुढील योग्य ती पावले उचलावीत.

३] ज्या पध्दतीने आर. टी. औ. पी. यु. सी. बाबत ड्राईव्ह कंडक्ट करतात त्या पध्दतीने आर. टी. औ. यांचेशी सल्ला मसलत करुन प्रचलित नियमानुसार ज्या गाडीचा हॉर्नचा आवाज शासनाने निर्गमित केलेल्या डेसिबलच्या बाहेर आढळल्यास त्यांचेविरुध्द नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

४] रात्रीच्या वेळी काही मौटार सायकलस्वार निवासी रस्त्यावर सुसाट वेगात रेस लावतात, त्यावर प्रतिबंधनात्मक कारवाई करण्याकरीता विशेष मौहिम राबवून, मौटार सायकलस्वाराविरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई करावी.

५. वरील सर्व सुचना संबंधीत पौलीस अधिकारी / कर्मचारी, मुख्यत: वाहतूक पौलीस यांचे निदर्शनास आणून द्यावे व वरील सुचनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्व पौलीस आयुक्त व सर्व पौलीस अधीक्षक हे स्वत: देखरेख करतील व त्याबाबत संबंधीतांना योग्य ते मार्गदर्शन करतील.

Circulate to all P.Stn for n.a.

[ अनुप कुमार सिंह ]
विशेष पौलीस महानिरीक्षक [का व सु ]
पौलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

सर्व पौलीस आयुक्त [लौहमार्गसह]
सर्व पौलीस अधीक्षक [ लौहमार्गसह]

प्रत,

सर्व परिक्षेत्रीय विशेष पौलीस महानिरीक्षक
कार्यासन अधिकारी, का. क्र. १४.

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०
डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर
(ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी संनित्रण समिती स्थापन करण्याबाबत)

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र. डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४ (भाग-२)/विशा १ ब
शहीद भगतसिंग चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ जुलै, २०१७.

वाचा :-

शासन परिपत्रक, गृह विभाग क्र.डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४(भाग-२)/विशा १ ब, दिनांक २८.०२.२०१७ व दिनांक ०३.०४.२०१७.

शुध्दीपत्रक :-

जनहित याचिका क्र.१७३/२०१० या संदर्भात मा उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.२०१५, २४.०६.२०१५ व दिनांक १०,११,१२ व १६.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ध्वनी प्रदूषणासंदर्भात प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांना संदर्भाधीन दिनांक २८.०२.२०१७ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार ध्वनी प्रदूषण संनियंत्रण समिती गठीत करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. त्यानुसार मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व नागपूर आयुक्तालयाकरिता सह पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सह नियंत्रण समितीची संरचना करण्यात आली आहे.

या संदर्भात सह पोलीस आयुक्त (का. व सु.), मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील इतर कोणत्याही जिल्हा व आयुक्तालयापेक्षा मुंबई शहराची कार्यकक्षा तुलनेने खुपच मोठी असल्याने तसेच मुंबई आयुक्तालय आस्थापनेवरील एकूण ९३ पोलीस ठाणे व १३ परिमंडळे ही संरचना व त्यानुसार कामाची प्रचंड व्यापती विचारात घेता ध्वनी प्रदुषण विरोधातील कारवाई अधिक प्रभावीपणे होण्याकरीता व त्यावर परिणामकारक पर्यवेक्षण राहण्यासाठी प्रस्तुत एक ध्वनी प्रदुषण संनियंत्रण समिती पुरेशी नाही. त्यामुळे मुंबई पोलीस आयुक्तलयासाठी एका समितीऐवजी प्रादेशिक विभागीय अपर पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ०५ ध्वनी प्रदुषण समित्या गठीत करण्याची शिफारस सह पोलीस आयुक्त (का. व सु.), मुंबई यांनी केली आहे.

त्यानुसार मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये सह पोलीस आयुक्त (का. व सु.), मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांऐवजी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत प्रत्येक प्रादेशिक विभागनिहाय एक अशा एकूण पाच ध्वनीप्रदूषण संनियंत्रण समित्या स्थापन करण्यात याव्यात असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता प्रत्येक प्रादेशिक विभागनिहाय ध्वनीप्रदूषण संनियत्रण समितीची (Monitoring Committee) संरचना खालीलप्रमाणे राहील असे वाचावे. :-

| | | |
|---|---|---|
| १. प्रादेशिक विभागीय अपर पोलीस आयुक्त, मुंबई | - | अध्यक्ष |
| २. परिमंडळीय पोलीस उप आयुक्त | - | सदस्य |
| ३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | - | सदस्य |

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७०७०७१५४३३१६५२९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb4279 3fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2017.07.07 15:43:36 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा.मंत्री /मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. महाराष्ट्रातील सर्व मा.संसद सदस्य
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
७. सर्व मा. विधानपरिषद / विधानसभा सदस्य
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग
१०. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१४. पोलीस आयुक्त (सर्व)
१५. परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व)
१६. सर्व प्रादेशिक विभागीय अपर पोलीस आयुक्त, मुंबई
१७. सर्व पोलीस उप आयुक्त, मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, अमरावती, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, लोहमार्ग मुंबई.
१८. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी (सर्व)
१९. जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
२०. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२१. गृह विभाग/ विशा १ ब
२२. निवड नस्ती.

अति.पो.अ.
पो.उप.अ.(मु.)
22 AUG 2017
का.अ.
नं.लि.
आ.क्रमांक

ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांक. ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/तां.क. १
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २२ ऑगस्ट, २०१७.

वाचा :- १) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ १२३(ई), दि. १४.२.२०००.
२) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ १००८(ई), दि. ११.१०.२००२
३) या विभागाचा शासन निर्णय ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/तां.क. १, दि. ५.९.२०१६.
४) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र. का.आ.२५५५(अ), दि. १०.८.२०१७.

प्रस्तावना :-

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयांच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५(२) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी (रात्री १० वा. पासून सकाळी ६ वाजेपर्यंत) करता येत नाही. या नियमामध्ये दि.११.१०.२००२ रोजीच्या अधिसूचनेन्वये केंद्र.शासनाने सुधारणा केली असून नियम ५ मध्ये उपनियम (३) चा नव्याने समावेश करण्यात आलेला होता. त्यांन्वये ध्वनी प्रदूषपणाची पातळी बिहित मर्यादेत राखून वर्षभरामध्ये १५ दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी रात्री १० वाजेपर्यंत ऐवजी रात्री १२ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक सणांकरिता करता येत होता. तसेच या अनुषंगाने जनहित याचिका क्र.१७३/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापरासाठी राज्य शासनाने निश्चित केलेल्या वर्षभरातील १५ दिवसांसाठी वेळेत सूट देण्यात आली होती. आता केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दि.१० ऑगस्ट, २०१७ रोजी ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ सुधारित अधिसूचना निर्गमित केलेली असून सदर अधिसूचनेन्वये नियम ३ मध्ये उपनियम (५) व नियम ५ मध्ये उपनियम (३) मध्ये सुधारणा केली आहे. आता नियम ५ मधील सुधारित उपनियम (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर वर्षातील एकूण १५ दिवसांसाठी (श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा वगळून) ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत करण्याकरिता वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी संबंधित राज्य शासन किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या जिल्हा प्राधिकरणाची असल्याने ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरासाठी वेळेत सूट देण्याबाबत जबाबदारी निश्चित करण्याची बाब शासन विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाच्या दि.१०/०८/२०१७ रोजीच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, २०१७ च्या नियम ५ उपनियम (३) व त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिप्पणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्हयांच्या निकडीनुसार वर्षामध्ये १५

संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाद्वारे या आदेशान्वये प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी यांनी संबंधित ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलिस अधिक्षक / पोलिस आयुक्त यांच्याशी सल्लामसलत करुन जिल्हयासाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये असे १५ दिवस निश्चित करुन त्याची आगाऊ यादी १ जानेवारी किंवा तत्पूर्वी जाहिर करावी. अशी सूट देतांना अधिसूचनेत घालून दिलेल्या ध्वनी मर्यादेचे व तरतूदींचे उल्लंघन होणार नाही व त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या अटी घालण्यात याव्यात. तसेच मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनी प्रदूषणासंबंधात दिलेल्या आदेशात नमूद बाबींचे तंतोतंत पालन करावे व न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही यांची काळजी घेण्यात यावी.

३. जिल्हयात वरीलप्रमाणे ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याबाबतची उपरोक्तनुसार सूट ही १५ दिवसांपेक्षा जास्त होणार नाही व ही सूट राज्य शासनामार्फत घोषित शांतता क्षेत्रात लागू नसल्याने त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांची राहील. अशा प्रकाराची परवानगी देतांना ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ३ व ४ चे पालन करण्यात यावे.

४. सन २०१७ या वर्षासाठी राज्य शासनाने दि.०५/०९/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या १५ दिवसांपैकी आतापर्यंत ५ दिवसांची सूट राज्यभर उपयोगात आलेली असल्याने सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आगामी उत्सव कालावधी लक्षात घेता सन २०१७ साठी उरलेले १० दिवस तात्काळ घोषित करुन त्याचा तपशिल प्रसिध्द करावा.

५. ध्वनी प्रदूषण नियम २००० अंतर्गत स्थापन केलेल्या ध्वनी प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर मा. उच्च न्यायालयाने दि.१६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशात विहित पध्दतीने कार्यवाही करावी. तसेच प्राधिकरणाने निदर्शास आणून दिलेल्या बाबींवर सबंधित जिल्हाधिकारी किंवा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम १९(अ) नुसार कार्यवाही करावी.

६. या शासन निर्णयान्वये, पर्यावरण विभागाने यापूर्वी दि.०५/०९/२०१६ रोजी या विषयी निर्गमित केलेला शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तत्काळ लागू होतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७०८२२१३०२२१७९०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वांक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinayak G Kadoo

Digitally signed by Vinayak G Kadoo
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=92d45ee51f2a551db32f5e6056b22f84b99bcf4c38f0bae7d3cdb71a716490ad, cn=Vinayak G Kadoo
Date: 2017.08.22 12:51:27 +05'30'

(वि.गो.कडू)
कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व.संसद्र सदस्य.
३. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. मा. मुख्य सचिव
६. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग
७. अपर मुख्य सचिव, गृह विभाग
८. प्रधान सचिव, गृह विभाग
९. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग
१०.सचिव, नगर विकास विभाग
११.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
१२.सर्व विभागीय आयुक्त
१३.सर्व जिल्हाधिकारी
१४.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
१५.मा. मंत्री व राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव
१६.सर्व पोलीस आयुक्त
१७.सर्व महानगरपालिका आयुक्त
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद
१९.सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
२०.सर्व मंत्रालयीन विभाग
२१.सर्व कार्यासने, पर्यावरण विभाग, मंत्रालय
२२.सर्व मुख्यधिकारी, नगरपालिका
२३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय (प्रसिध्दीसाठी)
२४.संचालक, मुंबई दूरदर्शन (प्रसिध्दींसाठी)
२५.संचालक, आकाशवाणी, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२६.निवड नस्ती.